MHYA050049362025

**-: <u>आदेश निशाणी क्रमांक १ खाली</u> :-**

१. अर्जदार ***श्रीमती सोनाबाई गुलाब राठोड*** यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये सी.एस.टी.सेंटर ईटावा वार्ड, पुसद येथील खाते क्रं.३४५१३०४६४८५ मध्ये ५,०००/— रुपये होल्ड करुन ठेवलेली रक्कम अर्जदारास भारतीय सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ अनुसार सुपुर्तनाम्यावर परत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिचे असे कथन आहे की, तिच्या वर नमुद खात्यात दरमहा शासनातर्फे श्रावणबाळ योजनंतर्गत १५०० रुपये जमा होत असते व ही रक्कम काढूनच अर्जदार तिचा उदरनिर्वाह करते. परंतु, सदर खात्यामध्ये दिनांक १८/०८/२०२५ रोजी यु.पी.आय/सी.आर/ ५२३००३३३९५६७/अंकित बी.ए. /के.के.बी.के/अंकित वर्मा/यु.पी.आय ००९६ चज७७३३१६२०९०/४५९ पुसद जि.यवतमाळ या हेड खाली ४३,०००/— रुपये रक्कम वळती झालेली आहे. सबब, सदरची ४३,०००/— रक्कम ही अर्जदार हिच्या खात्यात चुकून आल्यामुळे अर्जदार हिचे खाते फ्रिझ करण्यात आले आहे. त्यामुळे अर्जदार हिला तिचा चरितार्थ चालवण्याकरिता श्रावणबाळ योजनेतर्गत मिळत असलेली रक्कम ती वापरु शकत नाही.

३. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.एस.जवंजाळ यांनी अर्जदारास सदर रक्कम सुपुर्दनाम्यावर अटी-शर्तीसह न देण्याबाबत म्हणणे ***<u>निशाणी क्रमांक—१</u>*** वर सादर केलेले आहे.

४. अर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता श्री.पी.बी.वट्टमवार व सरकारतर्फे श्रीमती एस.एस.जवंजाळ यांचा युक्तीवाद ऐकला व दस्तऐवज पाहिले. माझ्या मते, सदर प्रकरणात सी.एस.टी.सेंटर ईटावा वार्ड, पुसद येथील खाते क्रं. ३४५१३०४६४८५ मध्ये ४३,०००/— रुपये खात्यामध्ये जमा असल्याचे

दिसुन येते. उर्वरित रक्कम ही अर्जदाराची आहे असे प्राथमिक दृष्ट्या दस्तांवरुन दिसून येते.

५. माझ्या मते, प्रस्तुत प्रकरणात **अर्जदार ही तक्रारदार** नाही. सदरचे खाते अर्जदाराच्या नावे असल्याबाबत पडताळणी केलेली बॅक बुकाची सत्य प्रत व अर्जदाराचे आधार कार्ड सत्यप्रत दाखल आहे. वरील कागदपत्रांवरुन अर्जदाराचा रक्कम रुपये ५,०००/— मालकी सिद्ध होते. सदरचे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा नंबर—३, पुसद येथे अर्जदाराचे असणारे खाते बंदस्थितीत राहिल्यास अर्जदाराचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, अर्जदार हिचे खाते फ्रिझ केलेले असल्यामुळे तिच्या खात्यात जमा होणारी श्रावणबाळ योजनेतंर्गतची ५,०००/— रुपये रक्कम तिला काढणे शक्य होणार नाही व अर्जदार ही तिचा उदरनिर्वाह चालू शकणार नाही. त्यामुळे अर्जदाराचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन सदरची रक्कम योग्य त्या अटी-शर्तीवर सोडणे योग्य होईल. म्हणून न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| -: आदेश :- | |
|---|---|
| १) | अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येतो. |
| २) | अर्जदाराने **रु.५,०००/- (रुपये पाच हजार)** चे बंधपत्र दिल्यानंतर सदरची रक्कम ही अर्जदारास सुपुर्तनाम्यावर परत करण्यात यावी. |
| ३) | भारतीय स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा—पुसद यांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदार हिचे खात्यामध्ये असणारी ५,०००/— रकमेपुरतेच सदरचे खाते हे डिफ्रिज करण्यात यावे. |
| ४) | अर्जदाराने रक्कम रुपये ४३,०००/— वर कोणताही हक्क व अधिकार प्रस्थापित करु नये. |
| ५) | तपासी अधिकारी, पुसद शहर यांना आदेशीत करण्यात येते की, सदर रक्कम सोपविण्यापूर्वी त्यांनी सदर रकमेचे रंगीत छायाचित्र व सविस्तर पंचनामा करावा. |

| | |
|---|---|
| **६)** | तपासी अधिकारी शहर पोलीस स्टेशन, पुसद यांना आदेश कळवावा. हमदस्त मंजुर. |

दिनांक : २१/०५/२०२६.

**(श्रीमती अमिता यु.यादव)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पुसद जि.यवतमाळ

| :: **Certificate of Stenographer** :: | | |
|---|---|---|
| "I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order." | | |
| Dictated On : | 15/03/2025 | |
| Transcribed On : | 15/03/2025 | **SD/-**<br>**( S. C. Sawant )**<br>**Jr. Clerk**<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pusad. |
| Checked & Signed On : | 15/03/2025 | |
| Date :<br>Place : | 15/03/2025 | |